**सं. फौ. ख. ९२/२०२४**
**सुनिल टुपके**
**वि.**
**ज्ञानदेव जाधव**

**फिर्यादीचा सरतपास शपथेवर पुढे सुरु.**
**फिर्यादीतर्फे ॲड. श्री. एम. एस. भिडे वकील साहेब यांचेकडून**

०१. मी अभिलेखावर माझे साक्ष प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. ते **नि. क्र. २८** वर आहे. सध्या ते मला दाखविले असता त्यातील मजकुर खरा असुन त्यावर माझी व माझे वकीलांची सही आहे.

०२. निशाणी २७ कडील यादीसोबत अनुक्रमांक १ कडे दि. ०१.१२.२०२३ रोजीचा स्टेट बँक ऑफ इंडियाचा मुळ धनादेश क्रमांक २०२६१३ रक्कम रु. ६,००,०००/– चा दाखल केलेला आहे. त्यावर आरोपीची सही आहे. त्यास **निशाणी ३०** देण्यात येते. निशाणी ४ कडील यादीसोबत अनुक्रमांक २ कडे सदरचा धनादेश न वटल्याबाबत चेक रिर्टन मेमो अभिलेखावर दाखल केलेला आहे. फंडस इनसफिसिएंट या कारणास्तव परत आल्याचे त्यामध्ये नमुद आहे. त्यास **निशाणी ३१** देण्यात येते. अनुक्रमांक ३ कडे आरोपीला नोटीस पाठविलेल्याची पोस्टाची पावती अभिलेखावर दाखल केली आहे. त्यास **निशाणी ३२** देण्यात येते. अनुक्रमांक ४ कडे दि. १३.१२.२०२४ रोजी आरोपीला वकीलांमार्फत पाठविलेल्या नोटीसीची स्थळप्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी व वकीलांची सही आहे. त्यास **निशाणी ३३** देण्यात येते. अनुक्रमांक ५ कडे आरोपीला सदरची नोटीस प्राप्त झाल्याबाबत पोहोच पावती अभिलेखावर दाखल केलेली आहे. त्यावर आरोपीचा मुलगा जालिंदर जाधव यांची सही आहे. ती मी ओळखतो त्यास **निशाणी ३४** देण्यात येते. अनुक्रमांक ६ कडे माझ्यामध्ये व आरोपीमध्ये झालेल्या ईसार पावती करारनामा दि. २७.०१.२०२२

रोजीचा अभिलेखावर दाखल केलेली आहे. त्यावर आरोपीची, माझी व साक्षीदार म्हणुन आरोपीचा मुलगा जालिंदर जाधव व माझे मामा सासरेचा मुलगा प्रविण नवले यांच्या सह्या आहेत. सदरचा दस्त हा नोटराईज करुन त्यावर नोटरीचा शिक्का व स्टॅम्प आहे. सदरचा दस्त हा नोटरी श्री. पी. एस. साखरे, रा. वैजापुर यांनी नोंदवुन घेतलेला आहे. त्यास **निशाणी ३५** देण्यात येते.

०३. अनुक्रमांक ७ कडे दि. १०.०२.२०२३ रोजी ईसार पावती संदर्भातील मुदत वाढीचा करारनामा अभिलेखावर दाखल केलेला आहे. त्यावर आरोपीची, माझी व साक्षीदार म्हणुन आरोपीचा मुलगा जालिंदर जाधव व माझे मामा सासरेचा मुलगा प्रविण नवले यांच्या सह्या आहेत. सदरचा दस्त हा नोटराईज करुन त्यावर नोटरीचा शिक्का व स्टॅम्प आहे. सदरचा दस्त हा नोटरी श्री. पी. एस. साखरे, रा. वैजापुर यांनी नोंदवुन घेतलेला आहे. त्यास **निशाणी ३६** देण्यात येते. अनुक्रमांक ८ कडे दि. २९.०४.२०२३ रोजी आरोपीला पाठविलेल्या कायदेशीर नोटीसीची पोस्टाची अभिलेखावर दाखल केलेली आहे. त्यास **निशाणी ३७** देण्यात येते. अनुक्रमांक ९ कडे दि. २९.०४.२०२३ रोजी व्यवहारात राहिलेली रक्कम रुपये ३ लाख देऊन खरेदीखत करुन देणे कामी पाठविलेल्या नोटीसीची स्थळप्रत मी अभिलेखावर दाखल केलेली आहे. त्यावर माझी व माझ्या वकीलांची सही आहे. त्यातील मजकुर खर व बरोबर आहे. त्यास **निशाणी ३८** देण्यात येते. अनुक्रमांक १० कडे सदरची नोटीस आरोपीला प्राप्त झाल्याची पोहोच पावती अभिलेखावर दाखल केलेली आहे. त्या **निशाणी ३९** देण्यात येते.

०४. निशाणी ६ कडील यादीसोबत अनुक्रमांक १ कडे दि. १६.०३.२०२४ रोजी पोस्ट मास्तर, पोस्ट ऑफिस कार्यालय धोत्रे यांना बुकिंग रजिस्टर संबधितास निश्चित किती तारखेस मिळाली याबाबत खुलासा मिळणेबाबत केलेल्या अर्जाची स्थळप्रत अभिलेखावर दाखल केली आहे. त्यावर पोस्टमास्तर यांची पोहोच असल्याची सही व पोस्टाचा शिक्का आहे. त्यास **निशाणी ४०** देण्यात येते. अनुक्रमांक

२ कडे आरोपीला चेक रक्कमेची मागणी करणारी नोटीस दि. २३.१२.२०२३ रोजी झालेल्या नोंदीचा उतारा अभिलेखावर दाखल केला आहे. त्यामध्ये अनुक्रमांक ४१ कडे आरोपी ज्ञानदेव कारभारी जाधव यांना पोहोच झाल्याची सही व तसा त्याबाबतचा पोस्ट ऑफिसचा शेरा व त्याला डिलीव्हरी झाल्याबाबत शेरा व पोस्ट मास्तर धोत्रे शाखा यांची सही व शिक्का आहे. त्यास **निशाणी ४१** देण्यात येते.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपीचे विधिज्ञ श्रीमती एम. व्ही. काटे यांचे तोंडी विनंतीवरुन पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

निवेदन श्रवणोत्तर स्विकृती,

Sd/-

**( जे.एस. केळकर )**

अति. मुख्य न्यायदंडाधिकारी-३

**कोपरगाव.**

दिनांक- १३/०४/२०२६

ठिकाण - **कोपरगाव**.